# महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, पुणे

## शतकोत्तर हीरक महोत्सवी वर्ष २०१९-२०

### कोरोना टाळेबंदी काळातील उपक्रम

२३/०४/२०२०

कोरोना संकटातील या उदासीन आणि भयप्रद वातावरणाला सामोरे जातांना आशावाद निर्माण करणारा छंद म्हणजे 'वाचनानंद' होय. घरातील व्यक्तींचा वेळ सत्कारणी आणि अर्थपूर्ण जर कोणी बनवला असेल तर तो पुस्तकांनी. कधी नव्हे ते घरातील एक दोन पिढ्या एकत्र नांदताना दिसत आहेत.

त्यात ग्रंथ हा असा खजिना आहे की ज्याचा जितका उपयोग आपण करून घेऊ तितके आपणच समृद्ध होत जातो. भावी काळातील असंख्य प्रश्न हे मनाशी निगडित असणार आहेत. अशावेळी मनाचा गुंता सोडविणारे आणि निसर्ग नियमांचे ज्ञान देणारी पुस्तकेही हातात हवीतच. घरातल्या पुस्तकालयामुळेच मी मलाही खूप श्रीमंत असल्यासारखे वाटते .श्रीकृष्णाने सांगितलेली गीता त्याकाळी अर्जुनासाठी जितकी उपयुक्त होती तितकीच ती आत्ताच्या एकविसाव्या शतकातही आहेच की....

गेल्या कित्येक दिवसांपासून वर्तमानपत्रातील आपुलकीची अक्षरे सुद्धा दुरावली गेली आहेत.

ज्या घरांमध्ये पुस्तकांचा विजनवास आहे त्या घरातील मुले मेंदूला बधिरता येईपर्यंत सतत टीव्ही पुढे बसताना दिसत आहे. त्यातून निर्माण होणाऱ्या आरोग्याच्या समस्या पालकांकडून ऐकल्या की जीवाची कासाविशी होते.मुलांना पुस्तकांच्या खजिन्याकडे वळवायलाच हवे. मस्तके घडविणारी पुस्तके मुलांच्या हाती तर हवीतच.....पण आधी पालकांच्या हाती हवीत.
सफदर हाश्मी असं म्हणतात की, पुस्तकं सांगतात गोष्ट वाहून गेलेल्या दिवसांची..... तसे करोनाचे हे ही दिवस जातील.... आणि मग आपल्या करोना डायरीतील वाचलेल्या पुस्तकांची यादी आपल्या मनात नेहमीच अल्हाददायक वसंत नंतरसुद्धा निर्माण करेल.

सांगा पाहू तुम्हाला कुठल्या पुस्तकाने वेड लावले आहे? किंवा या करोना काळात तुम्ही काय वाचत आहात?

आज २३ एप्रिल जागतिक पुस्तक दिन. प्रसिद्ध नाटककार विल्यम शेक्सपियर यांचा जन्मदिवस. 'टू बी ऑर नॉट टू बी...' असं म्हणणारा शेक्सपिअरचा सुप्रसिद्ध हॅम्लेट आजही वाचताना नव्याने अर्थ उलगडत राहतो. त्यांची निर्मिती ही केवळ ब्रिटिशांसाठी अभिमानाची गोष्ट नाही तर ती विश्व विश्वाची अमर विभूती आहे.

# महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, पुणे

## शतकोत्तर हीरक महोत्सवी वर्ष २०१९-२०

### कोरोना टाळेबंदी काळातील उपक्रम


२३/०४/२०२०

मित्रांनो आणि मैत्रिणींनो  जागतिक पुस्तक दिनाच्या निमित्ताने लिहिलेली ही कविता जरूर वाचा आणि कृपया अभिप्राय कळवा.

भयप्रद उदास दिवसांमध्ये....

ग्रंथांच्या गाभाऱ्यातून अनाहताचा नादऽऽ
ज्या घरात ग्रंथालय ती घरे किती श्रीमंतऽऽ

वाचता वाचता काही अनवट लहर उठावीऽऽ
खोल खोल तळाशी स्मरणाची झिंग चढावी

काचेवरती बोटे किती सहजपणे फिरतातऽऽ
पण लळा लावते पुस्तक,मोबाईल भासे रुक्ष

डिजिटल जगात असुनी पुस्तक हाती रहावे
पानांच्या स्पर्शामधुनी आकाश कुसुंबी व्हावे

जगण्याची मैफल माझ्या पुस्तक खुलवीत जाते
ते आहे जवळी म्हणूनी जगण्याचे गाणे होते

बोलतात अक्षरे माझी पानातून वाहतो श्वास
ग्रंथातून भेटे ईश्वर शब्दातून फिरतो प्राणऽऽ

भयप्रद उदास दिवसांमध्ये पुस्तक भासे गुरु
अत्तराचे दिवस आठवूनी आनंदाने झरूऽऽ




( प्रा. डॉ.वर्षा तोडमल )
मराठी विभाग प्रमुख,
आबासाहेब गरवारे महाविद्यालय
varsha.todmal@gmail.com
9096951200